Goel Ganga Foundation
Estd : 2007

# GG INTERNATIONAL SCHOOL

Affiliation No.: 1130198 ● School Code 30144

GGF: 3rd Floor, San Mahu Complex, Opp. Poona Club, Pune - 411001
GGIS: S.No.174-177, Swarganga, Vallabhnagar, Pimpri, Pune - 411018

GGIS
स्वात्मानं बोध
ISO-9001:2015

Ref No: GGIS/2020-21/PTA Circular/003

Date:06/06/2020

To,

**The Executive Members of Parents Teacher Association-2019-20**

This is to inform you all that. Govt of Maharashtra has released a notification dated 04.06.2020 no :-Sankirna/1120/Pra.Kra.262/MM-1 regarding Extension for the formation of Executive Body of Parent Teacher Association (EPTA) for the academic year 2020-2021 due to non working of school Physically in impact of Covid-19.

In GG International school-Pimpri EPTA of 2019-20 was formed on 27th April 2019.We will not be able to form the EPTA for 2020-21 untill the school reopens physically.

Hence EPTA members of 2019-20 are requested to continue to be a EPTA member till the school forms the new EPTA for the academic year 2020-2021.

We will update you once the school is in process for formation of EPTA Members.

Bhagwani

Mrs. Bharti Bhagwani
Principal

INTERNATIONAL SCHOOL, PUNE
AFFL No. 1130198

ENCL: Govt Notification

शाळा व्यवस्थापन समिती (SMC)
पालक शिक्षक संघ (PTA) यांना
मुदतवाढ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः संकिंर्ण-११२०/प्र.क्र.२६२/एमएम-१**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक:- ०४ जून, २०२०

वाचा :-

१) साथ रोग अधिनियम, १८१९
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९
४) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २०११
५) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११
६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) निमय २०१६
७) सार्वजनिक आरोग्य विभागाची अधिसूचना दिनांक १३.०३.२०२०.

प्रस्तावना :-

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) कोरोना विषाणू (Covid-१९) या आजारास जागतिक महामारी म्हणून घोषित केलेले आहे. या आजाराच्या संसर्गाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी संदर्भ क्र.७ अन्वये राज्यात साथरोग अधिनियम १८१९ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ ची अमंलबजावणी सुरु आहे. अशा परिस्थितीमध्ये शाळा बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. दरम्यानच्या काळात संदर्भ क्र. ३ मधील कलम २१ व संदर्भ क्र.४ मधील नियम क्र.१३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या शाळा व्यवस्थापन समिती तसेच संदर्भ क्र.५ च्या कलम ४ अन्वये व संदर्भ क्र६ च्या नियम क्र.६ अन्वये स्थापन झालेल्या पालक शिक्षक संघ व कार्यकारी समिती यांची मुदत समाप्त होत असल्यास व शाळा सुरु होण्यापूर्वी त्या नव्याने स्थापन करणे शक्य नसल्याने त्यांची कार्ये विनाअडथळा पार पाडणे आवश्यक असल्याने त्यांना शाळा सुरु होईपर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

बालकांचा मोफत व सक्तीच्या अधिकार अधिनियम २००९ मधील कलम ३८(२)(f) अन्वये, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ मधील कलम (२१) अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम (२६)(i)(l) अन्वये प्राप्त अधिकारान्वये शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णयः-**

२. बालकांचा मोफत व सक्तीच्या अधिकार अधिनियम २००९मधील कलम (२१)अन्वये व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या अधिकार नियम २०११ मधील नियम (१३) अन्वये स्थापन झालेल्या शाळा व्यवस्थापन समितीस शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शाळा सुरु होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११मधील कलम (४) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या पालक शिक्षक संघ व महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम २०१६ मधील नियम(६) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या कार्यकारी समितीस शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शाळा सुरु होईपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. ज्यांची मुदत समाप्त झाली आहे अथवा शाळा सुरु होण्यापूर्वी समाप्त होणार आहे त्यांनाच फक्त वरील आदेश लागू राहील.

५. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ सुरु झाल्यानंतर उक्त समिती /संघ नियमाप्रमाणे नव्याने स्थापन करण्यात यावेत.

६. उक्त समिती/संघास पूर्वीप्रमाणेच सर्व अधिकार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(इ.मु.काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक.
२) मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक.
३) मा.अ.मु.स. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक.
४) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) निवडनस्ती/एमएम-१ कार्यासन.